Impact Factor - 6.293

ISSN-2349-638x

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

## Special Issue No.71

## Significance Of Fairs And Festivals In Human Life

**Chief Editor**

**Pramod P. Tandale**

**IMPACT FACTOR**

**SJIF 6.293**

For details Visit our website

www.aiirjournal.com

Shahid Virpatni Laxmi Mahavidyalaya Titave
Affi No. 452

| Sr. No. | Name of the Researcher | Title of The Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 72 | प्रा. दिग्विजय दत्तात्रय कुंभार | सण, उत्सव आणि सोशल मीडिया | 232 |
| 73 | प्राप्रविण. प्रकाश डांगे | कृषी संस्कृतीचा दिपोत्सव दिपावली - | 236 |
| 74 | दिपाली विजय पाटील | महाराष्ट्रातील सणउत्सव आणि आरोग्य- | 238 |
| 75 | डॉमनीषा आझाद नायकवडी. | सण उत्सवांचे साहित्यामधील प्रतिबिंब - | 242 |
| 76 | डॉआझाद पापालाल नायकवडी . | सण /उत्सवाचे पारंपरिक - धार्मिक/ सामाजिक/ सांस्कृतिक ऐतिहासिक महत्त्व / | 246 |
| 77 | प्रापांडूरंग फराकटे . | सण - उत्सव दळवणवळण व पर्यटन विकास | 251 |
| 78 | डॉ आवळे.सिंधू ज | दिन दिन दिवाळीएक दीपोत्सव एक ............. आनंदोत्सव | 255 |
| 79 | डॉ. कल्पना पाटोळे | भारतीय संस्कृति के प्राण: पर्व एवं त्यौहार (हिंदी उपन्यासों के संदर्भ में) | 258 |
| 80 | वनिता कुंभार | सण, उत्सव आणि बदलते पर्यावरण | 262 |
| 81 | डॉ. लता पां मोरे . | मधील कोर्टकमिटेड मुलांचे 'बिनपटाची चौकट' उत्सवाचे अनुभव-सण | 265 |
| 82 | डा.एम डी गुरव | मेला - त्योहार और राष्ट्रीय एकात्मता | 269 |
| 83 | प्रामाधुरी परशुराम कांबले . | दोहरा अभिशाप में चित्रित त्योहार और उसत्व | 272 |
| 84 | डॉमनाली अमोल सूर्यवंशी . | शिवानी की कहानियों में चित्रित पहाड़ी संस्कृति | 275 |
| 85 | डॉ. शुभांगी सदाशिव माने | भारतीय सण - उत्सव विज्ञानाचे प्रतिक | 279 |
| 86 | डॉसुलतान. पिरू पवार | आदिवासींच्या सण - उत्सवातील जीवनमूल्ये | 283 |
| 87 | प्राज्योती तानाजी गावडे. | भारतीय सण आणि आरोग्य | 288 |
| 88 | डॉ. हणमंत रामचंद्र पोळ | सणांचे सांस्कृतिक महत्त्व | 291 |
| 89 | डॉप्रकाश गणपती पाटील . | दक्षिण कोकणातील गणेशोत्सवाचा एकत्रित कुटुंब व्यवस्थेवरील प्रभावाचा अभ्यास | 294 |
| 90 | डॉ प्रतिभा सदाशिव देसाई . | सण विज्ञान व आरोग्य महत्त्व उत्सवामागील - | 297 |
| 91 | प्रा. ओमप्रकाश फुलबांधे | सण उत्सवाचे पारंपरिक ,सामाजिक ,धार्मिक सांस्कृतिक व ऐतिहासिक महत्त्व | 302 |




Shahid Virpatni Laxmi Mahavidyalaya Titave Affi No. 452

# सण, उत्सव आणि सोशल मीडिया

**प्रा. दिग्विजय दत्तात्रय कुंभार**
शहीद वीरपत्नी लक्ष्मी महाविद्यालय, तिटवे.
मास मिडीया विभाग.

**प्रस्तावना:**

"उत्सवप्रियः खलु मनुष्यः" असे महाकवी कालिदास यांनी म्हटले आहे आणि ते शंभर टक्के बरोबर आहे. माणूस हा खरोखर उत्सवप्रिय आहे. त्यामुळेच भारतीय संस्कृतीत सण आणि उत्सवांना विशेष महत्व आहे. सण असो किंवा कोणताही समारंभ असो, त्यात सर्वजण उत्साहने सहभागी होतातच.सण, उत्सव, व्रते,समारंभ या स्वरुपाचाआपल्याला फार मोठा वारसा लाभलेला आहे.विषेश म्हणजे भारतीय संस्कृती ही आजपर्यंत टिकून आहे, त्याचे सर्वात जास्त श्रेय येथील सण आणि उत्सवांनाच जाते.कारण प्रत्येक सण हा या देशाच्या वेगवेगळ्या संस्कृतीचे प्रतिक आहे. प्रत्येक सणात आपल्या संस्कृतिचे प्रतिबिंब दिसते.

पूर्वापार चालत आलेल्या या सणांमध्ये आणि उत्सवांमध्ये मानवी समूहाचा सहभाग नेहमीच उल्लेखनीय राहिलेला आहे. परंपरेतून पुढे येत असताना आज मानवी जीवनात अनेक घटकांची भर पडल्याचे दिसून येते त्यापैकीच एक म्हणजे स्मार्टफोन. स्मार्टफोन हा आजच्या मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. किंबहुना मोबाईल हा आपल्या शरीराचा एक अवयव बनत चालला आहे अशी उपमा ही सध्या दिली जात असते. मोबाइलच्या गरजेचं रुपांतर व्यसनात कधी झालं हे आपल्याला कळलंच नाही.त्याची सवय लहानांना . होऊ लागलीय आणि तरुणपिढीवर तर त्याचे थेट दुष्परिणाम दिसायला लागले आहेतत्यातूनच सोयीपेक्षा हा . मोबाइल आपलं जगणंच हैराण करुन सोडताना दिसतोय.

मोबाईलच्या अति वापरास सध्याचे स्वस्त असलेले इंटरनेट प्लॅन, अनलिमिटेड डेटा यांचा प्रमुख हातभार आहे. या सगळ्याचा परिणाम मानवी जीवनाच्या सर्वच बाबीत होत आहे. आपली छोट्यात छोटी बाब ही फेसबुक, इंस्टाग्राम आणि व्हाट्स अॅपच्या स्टेट्स ला लावण्यात येते. तर या अशा परिस्थीतीमध्ये आपण सणाच्या शुभेच्छा देण्यासाठी सोशल मीडियाचा वापर केला नाही तर नवलच म्हणावे लागेल.तर अशा या सोशल मीडियातून सणांचा होणारा प्रसार, प्रचार आणि एकंदरीत त्याचा परिणाम खालीप्रमाणे दिसून येतात.

**सण :** "सण हा शब्द 'क्षण' ह्या संस्कृत शब्दावरून आलेला आहे. क्षण-छण-सण अशी त्याची व्युत्पत्ती देतात. हेमचंद्राच्या प्राकृत व्याकरणात छण म्हणजे उत्सव असा अर्थ दिलेला असून मेघदूत दशकुमारचरित, श्रीमद्भागवत इ. संस्कृत ग्रंथातही उत्सव या अर्थाने क्षण ही संज्ञा आढळते."[1]

**सोशल मीडिया :** सोशल मीडिया या टर्मचे दोन भाग पडतात . 'सोशल' चा संदर्भ हा व्यक्तीच्या ग्रुपबरोबर किंवा कम्युनिटी बरोबर परस्पर संवाद असा घेता येईल आणि मीडियाचा (माध्यम) संदर्भ वेगवेगळ्या चॅनेल्सकडून, जाहिरात किंवा संवादसंदर्भातील वेगवेगळ्या कल्पना असा लावता येईल. सोप्या शब्दांत सांगायचे तर, सोशल मीडिया हे तंत्रज्ञान आणि वेबवर आधारित टूल आहे. सामाजिक, परस्पर संवाद (Social Interaction) जे जगाच्या कानाकोपऱ्यात असलेल्या लोकांचे अनुभव, विचार, मते एकमेकांपर्यंत पोहोचवते, अनुभूती देते सोशल मीडिया वेबसाईटस या लोकांनी लोकांसाठी ( By the people, for the people) तयार केलेल्या असतात.

'सोशल मीडिया' म्हणजे नुसते 'सोशल नेट्वर्किंग' नव्हे. त्यापेक्षाही ते बरेच काही आहे. लोकांना आपली मते व्यक्त करता येतील आणि माहितीची देवाण-घेवाण करता येईल, अशा अनेक वेबसाईटसचे एकत्रीकरण म्हणजे 'सोशल मीडिया.' त्याला 'सोशल साईट्स असेही म्हणतात.[2] लोकसत्ता माध्यमाने प्रकाशित केलेल्या माहितीनुसार खालीलप्रमाणे सोशल मीडिया अॅप्लिकेशन्स वापरली जातात.



Laxmi Mahavidyalaya Aff. No. 452 Titave

**समाजमाध्यमं- सदस्यसंख्या (आकडे दशलक्षमध्ये)**

| | | | |
|---|---|---|---|
| फेसबुक | २९८९ | बैदू टिबा | ३०० |
| यूट्यूब | १९०० | स्काइपे | ३०० |
| व्हॉट्सॲप | १५०० | लिंकडेन | २९४ |
| फेसबुक मेसेंजर | १३०० | विबर | २६० |
| वी चॅट | १०४० | स्नॅपचॅट | २५५ |
| इन्स्टाग्राम | १००० | लाइन | २०३ |
| क्युक्यु | ८०६ | पिंटेरेस्ट | २०० |
| ओझोन | ५६३ | टेलेग्राम | २०० |
| टिकटॉक | ५०० | टिंडर | १०० |
| सिना वेबो | ४९१ | टम्बलर | |
| ट्विटर | ३३६ | क्योरा | |
| रेडिट | ३३० | | |

**सोशल मीडियाचा आणि भारत:**

इंटरनेटचा प्रसार जितक्या झपाट्याने होत गेला. त्याचबरोबर त्याच्या वापरकर्त्यांची संख्या ही झपाट्याने वाढत गेली. भारतातील इंटरनेट आणि सोशल मीडियाच्या वापरकर्त्यांची संख्या आश्चर्यकारक आहे. २०१९ या वर्षाच्या शेवटी हाती आलेल्या आकडेवारी नुसार भारतामध्ये ६२७ दशलक्ष इंटरनेटवापरकर्ते आहेत. यापैकी ८७ % लोक म्हणजेच ४९३ द.ल. व्यक्ती या इंटरनेटचा नियमितपणे वापर करतात. त्यापैकी २०० द.ल. व्यक्ती या ग्रामीण भागातील आहेत. ही सर्व आकडेवारी Kantar IMRB या संस्थेने सादर केलेल्या अहवालात आढळते.[४]

**सोशल मीडिया ॲप्लिकेशन्स चा वापर:**

नीती आयोगाचे मुख्य व्यवस्थापक श्री. अमिताभ कांत यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिलेल्या माहितीनुसार भारतामध्ये ४०० द.ल. व्हाट्स ॲप वापरकर्ते आहेत.[५] जवळपास सर्वच स्मार्टफोन वापरणाऱ्या व्यक्ती या फेसबुक वापरतात असा दावा आहे. सन २०१८ मध्ये फेसबुक वापरणाऱ्या व्यक्तींची संख्या २८१ द. ल. असून २०२३ या वर्षापर्यंत ती ४४२.२ द.ल. इतकी होईल असा अंदाज वर्तवण्यात आला आहे.[६] ही संख्या पाहता आपल्या देशात इंटरनेट आणि सोशल मीडिया ॲप्लिकेशन्स चा वापर किती अधिक आहे हे लक्षात येईल.

**सोशल मीडिया आणि सण:**

पूर्वीच्या काळी म्हणजे अगदी इंटरनेटचा वापर सुरु होण्यापूर्वी भेटकार्ड देण्याची प्रथा होती मात्र, भेटकार्डे जाऊन आजकालच्या इंटरनेटच्या जमान्यात दुनिया मुठीत आल्याने शुभेच्छांची देवघेवही व्हाट्स ॲप फेसबुकद्वारे ऑनलाईन होऊ लागली आहे. साऱ्यांवर आता सोशल मीडियाचे गारुड आहे. सोशल मीडियावरून होत असलेल्या शुभेच्छांचा वर्षाव हा आता नित्याचाच रतीब बनला आहे. व्हाट्स ॲपवर तर रोजच कोणत्या ना कोणत्या शुभेच्छा दिल्या जातात. हल्ली दिवाळी असुदे किंवा कोणताही सण असुदे सोशल मीडियाचा सर्वाधिक वापर होताना दिसून येतो. काहींना पार्टीस्थळावरून फेसबुक लाइव्ह करून थैट शुभेच्छा दिल्या जातात

**सोशल मीडियावर दिल्या जाणाऱ्या शुभेच्छा:**

- **टच धिस लाईन** : या अशा प्रकारच्या मेसेजमधून एखादी लिंक दिली जाते त्या लिंकवरून एखाद्या वेबसाईट वर नेले जाते. त्यामध्ये ॲनिमेशन किंवा झिप फाईलच्या वापरातून शुभेच्छा दिल्या जातात[७]
- **व्हिडीओ आणि स्टेट्स:** विडमेट, टिकटॉक, युट्युब, शेअर चॅट यासारखे अनेक ॲप्लिकेशन सध्या उपलब्ध आहेत. त्यावरून अनेक व्हिडीओ डाऊनलोड करून तेच पुढे पाठवले जातात. अनेकांच्या व्हाट्स ॲप आणि फेसबुक स्टेट्स ला असे अनेक व्हिडीओ पहायला मिळतात. जर एक चित्र हजार शब्दांच्या बरोबरीचे आहे. 'या अनिमेटेड दिवाळीच्या शुभेच्छा पाठवून आपण आपल्या प्रिय व्यक्तींच्या चेहऱ्यावर खुशी आणू शकता. येथे काही दीपावली व्हिडीओ आहेत जे आम्ही आपल्यासाठी निवडले आहेत.'[८] अशा प्रकारे मेसेज देऊन ' स्नॅपट्यूब' सारख्या ॲप्लिकेशनने आपली जाहिरात केली आहे. यावरून व्हिडीओ मेसेज तयार करण्याची आणि ते पाठविण्याची लोकप्रियता लक्षात येते.

- **फोटो आणि मेसेज वापर** : व्हाट्स ॲप सारख्या एका ॲप्लिकेशनच्या माध्यमातून दिवसभरात जवळपास ५५ अब्ज मेसेज दररोज पाठवले जातात. त्यामध्ये ४.५ अब्ज फोटो तर १ अब्ज व्हिडीओ असतात.[९] आजघडीला फेसबुकवर २.५ ट्रिलियन पोस्ट आहेत. दिवसाकाठी ५०० द.ल. पोस्ट पाठविल्या जातात. तर २ अब्ज व्यक्ती फेसबुकवरील लाइव व्हिडीओ एकदातरी पाहतात. भारत हा जगातील सर्वात जास्त फेसबूक वापरणाऱ्या व्यक्तींचा देश आहे.[१०] ही बाब लक्षात घेऊन वरील आकडेवारी जरी जागतिक संदर्भातील असली तरी त्यात आपण निश्चितपणे वरच्याच क्रमांकावर आहोत. सणाच्या दिवशी पाठवल्या जाणाऱ्या मेसेजेसची अधिकृत आकडेवारी जरी मिळाली नसली. तरी सर्वसाधारण दिवसात केल्या जाणाऱ्या पोस्ट पेक्षा ही संख्या निश्चितच जास्त आढळते.

**सणांच्या कालावधीत पसरणारे सामाजिक आणि पर्यावरणविषयक संदेश:**

"होळी करा लहान, पोळी करा दान, शेणी करा दान" "इकोफ्रेंडली गणेशोत्सव""फटाक्यांविरहित दिवाळी" " यंदा कोरडी रंगपंचमी साजरी करूया" पाण्याची नासधूस करण्या ऐवजी त्याचा जपून वापर करा. एकमेकांवर व्हाट्स ॲपच्या माध्यमातून रंगांची उधळण करा. अन्न टाकून देण्या ऐवजी गरिबांना दान करा. सणाचा अवाढव्य खर्च कमी करून तो पैसा गरजूंना द्या."यासारखे अनेक मेसेज सोशल मीडियातून पाठवले जात असतात. अशा प्रकारच्या अनेक संकल्पना उदयास येत आहेत.[११] अशा प्रकारच्या संदेशांद्वारे सामाजिक आणि पर्यावरण विषयक विचार मांडले जातात. त्यातून समाजोपयोगी आणि पर्यावरण संवर्धन करण्यासाठी लोकांना प्रेरीत करण्यात येते. ही सोशल मीडियाची उल्लेखनीय बाब आहे.

**सणांची विटंबना :**

"बायकोच्या बैलालाही बैलपोळ्याच्या शुभेच्छा" "ही पत्नी परत मिळू नये म्हणून पुरुष वडाच्या झाडाला पाणी घालत आहेत" यासारखे असंख्य विनोद सोशल मीडियावर फिरतात. या संदेशांमधून सणाची विटंबना केल्याचेही काही प्रकार घडतात. आताच्या पिढीवर असलेला पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव आणि घरातून धार्मिकतेचे न मिळणारे संस्कार यांमुळे सण उत्सवांवर विनोद करताना आणि ते फॉरवर्ड करताना-लोकांना काहीच वाटत नाही.[१२] सोशल मीडियामधून असे प्रकारही दिसून येतात.

**निष्कर्ष:**

आजघडीला एकमेकाना शुभेच्छा देण्यासाठी केला जाणारा सोशल मीडियाचा वापर पाहता खऱ्या अर्थाने सोशल मीडिया मानवी जीवनाचा अविभाज्य भाग बनल्याचे दिसते. भारतातील इंटरनेट वापरकर्त्यांची संख्या पाहता सोशल मीडिया हे खूप प्रभावशाली शस्त्र बनत चालल्याचे आढळते. सोशल मीडियामुळे जग जवळ तर आलेच. त्याचबरोबर आपले सण उत्सव जगभरात पोहचविण्याचे कामही आपसूक घडत आहे. एकमेकांशी संपर्क करणे अधिक सोपे झाल्यामुळे माणसे जोडण्याचे काम यामाध्यमातून होत आहे. सणांची फक्त प्रसिद्धी न करता याच सोशल मीडियाला हाताशी धरून सामाजिक सलोखा, पर्यावरणवादी दृष्टीकोन जपला जात असल्याचेही आढळते.

वरीलप्रमाणे काही सकारात्मक बाबी असल्या तरी, ऑनलाईनच्या या जमाण्यामुळे ग्रीटींग्ज सारख्या भेटवस्तू खरेदी करण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. प्रत्यक्ष गाठीभेटी घेऊन सण आणि उत्सव साजरे करण्याचे दिवस सध्या मागे पडत आहेत. विनोदाच्या माध्यमातून सणांची केली जाणारी विटंबना ही चिंतेची बाब आहे. असे प्रकार थांबवणे गरजेचे आहे. एकंदरीत पाहता सोशल मीडिया सण आणि उत्सवांवर सकारत्म आणि नकारात्मक दोन्ही प्रकारचे परिणाम घडवून आणत आहे. त्यातूनच सण आणि उत्सव साजरे करण्यात सोशल मीडिया प्रभावशाली असल्याचे दिसून येते.

Affi No. 452

**संदर्भ:**


1. वाड विजया(संपादक) - मराठी विश्वकोश खंड - १८, प्रकाशन - सचिव महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई. पृ. ५८२
2. पाटील सलोनी - सोशल मीडिया, प्रकाशक - विजया पाटील, मुक्ता पब्लिशिंग हाउस प्रा. लि. कोल्हापूर. पृ. ९
3. https://www.loksatta.com/vishesha-news/one-day-on-social-media-1783628/
4. https://economictimes.indiatimes.com/tech/internet/internet-users-in-india-to-reach-627-million-in-2019-report/articleshow/68288868.cms
5. https://techcrunch.com/2019/07/26/whatsapp-india-users-400-million/
6. https://www.statista.com/statistics/304827/number-of-facebook-users-in-india/
7. https://www.esakal.com/mumbai/marathi-news-mumbai-news-new-year-celebration-social-media-89925
8. https://www.snaptubeapp.com/how-to/news/diwali-wishes-greetings-ma.html
9. https://www.businesstoday.in/technology/news/whatsapp-users-share-texts--photos-videos-daily/story/257230.html
10. https://www.socialpilot.co/blog/social-media-statistics#fb-usage-stats
11. https://www.esakal.com/paschim-maharashtra/dry-holi-celebrate-35535
12. https://www.mahamtb.com/Encyc/2019/6/17/readers-letter-on-hindu-festivals-trolls.amp.html


Shahid Virpatni Laxmi Mahavidyalaya Affi No. 452 Titave